# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत

अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

## संशोधन विषय

"A Critical Study of Sustainability and Economic Viability of The Tribal Agriculture Practices – With Special Reference To Raigad District." (2014 To 2024)

"आदिवासींच्या शेतीची शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यतेचे चिकित्सक अध्ययन – विशेष संदर्भ रायगड जिल्हा" (२०१४ ते २०२४)


संशोधक

**कुंडलिक भिमराव चौगुले**

सहयोगी प्राध्यापक

जे.एस.एम. कॉलेज अलिबाग,
ता- अलिबाग, जि – रायगड.४०२२०१

**संशोधन मार्गदर्शक**

**डॉ. सी. जे. देशमुख**

M.A, Ph.D, NET

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर. जिल्हा - लातूर


संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर. जिल्हा - लातूर

(सप्टेंबर २०२३)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | संशोधन आराखड्यातील घटक | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १ | प्रास्ताविक | १ व २ |
| २ | संशोधन समस्या | ३ |
| ३ | पूर्व संशोधन साहित्याचे परीक्षण / आढावा | ३ व ४ |
| ४ | संशोधन व्यवधान (रिसर्च गॅप) | ५ |
| ५ | संशोधनाचे महत्व | ५ |
| ६ | संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा | ६ |
| ७ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ६ |
| ८ | परिकल्पना | ७ |
| ९ | संशोधन पध्दती | ७ व ८ |
| १० | प्रकरण व्यवस्था | ८ व ९ |
| ११ | संदर्भ सूची | ९ व १० |

## १.प्रास्ताविक -

मानवाचा विकास आणि शेतीचा विकास हा बरोबरच झालेला दिसून येतो. या दोन्ही विकासामध्ये आंतरसंबंध आहे. कारण आदिवासी, कुणबी आणि मराठा या समाज गटांचा अभ्यास असे सांगतो की, कुणबी, मराठा यांसारखे लोक जमिनीला धरुन राहिले, त्यांना अडीअडचणी आल्या असल्यास तरी शेतीतील सुधारणेमुळे अधिक स्वास्थ, स्थिरता व समृध्दी मिळविता आली.(बोकिल-१७) ते आदिवासी समाजातील लोकांच्या बाबतीत घडले नाही. आदिवासी समाजातील लोकानांही स्थिरता येऊ शकते.

ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नोंदीप्रमाणे १८८२ च्या आसपास वारली लोक स्थिर शेती करु लागले. देशाच्या इतर भागात ही आदिवासीची शेती सुरु झाली (मिलिंद थत्ते -२०). डॉ. विल्सन ह्यांचा इ.स. १८४२ साली आदिवासी जमातीशी संबंध आला. तेव्हा त्यांनी असे निरीक्षण नोंदविले आहे की, वारली लोक प्रामुख्याने नागली (नाचणी), तूर, उडीद, वाल आणि थोडया प्रमाणात भात पिके लावतात. (सावे -१९१) नागली म्हणजेच नाचणीची शेती डोंगर उतारावर केली जाते. (थत्ते –३५) आजच्या बहुसंख्य म्हणजे १९ दशलक्ष आदिम जमाती पैकी १७ दशलक्ष आदिम जमाती शेती करतात (गुरुनाथ नाडगोंडे-२६९) यावरुन असे स्पष्ट होते की, पूर्वी पासूनच आदिवासी समाज शेतीशी संबंधित आहेत आणि ते उत्तम प्रकारे शेती करताना दिसतात.

‘आदिवासी’ शब्दाचा अर्थ त्या-त्या ठिकाणाचे ‘आदय’ किंवा अगदी ‘मूळचे रहिवासी’ असा होतो. इंग्रजी भाषेत वर्णन करताना आदिवासींसाठी “ट्रायबल” (Tribal) हा शब्दा वापरला जातो. हा शब्द “समूह” वाचक आणि विशिष्ट जीवनशैली दाखविणारा शब्द आहे. आदिवासी कोणाला म्हणायचे याबाबतीत मानववंशशास्त्रज्ञांनी व इतर अभ्यासकांनी आदिम समाजाच्या केलेल्या व्याख्या विचारात घेणे आवश्यक आहे. गिलीन व गिलीन यांच्यामते, “एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला ‘आदिवासी समाज’ म्हणतात”.(डॉ. गोविंद गारे-१) इंपिरियल गॅझेटमध्ये आदिवासींची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. “समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भू-भागात राहणाऱ्या, सुरुवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेला पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाह नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबांच्या समुच्चयाला ‘आदिवासी समाज’ असे म्हणतात.” (डॉ.गोविंद गारे-२) इ.स. १९६२ साली शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची सर्वसमावेशक व्याख्या केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे. “एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागसलेला, अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला ‘आदिवासी समाज’ म्हणतात.” (डॉ. गोविंद गारे-२) श्री. डी. एन. मुजुमदार यांच्यामते, “समान नाव असणारा, एकाच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेधनियमांचे पालन करणारा

व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबांचे किंवा कुटुंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय." (डॉ. गोविंद गारे- २). १९५० साली काही निकष ठरवून एक यादी (सूची) तयार करण्यात आली आणि त्यात समाविष्ट केलेल्या समुहांनाच आदिवासी म्हणण्याची पध्दत पडली, त्यातले बहुसंख्य समूह हे भारताच्या आदिम शेतकरी समाजाचे घटक होते. आजही भारतातल्या प्रमुख आदिवासी जमाती ह्या "शेतकरी" जमाती आहेत. महाराष्ट्रातल्या भिल्ल, गोंड, वारली, कोकणा, कोलाम, कोरकू, महादेव कोळी ह्या सर्व प्रमुख जमाती शेतीच्या आधारानेच उपजिविका करतात. (बोकीळ -२९) रायगडमध्ये ठाकूर, महादेव कोळी इ. आदिवासी जमाती राहतात आणि सर्व जमाती शेतीच्या आधारानेच उपजिविका करतात. रायगड जिल्हा समुद्र किनाऱ्यालगत कोकण पट्टीतील आहे. या कोकणातल्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे शेती करण्याच्या दोन ढोबळ पध्दती आढळतात. एक 'आळी' आणि दुसरी 'दळी'. सखल प्रदेशात जमीन नांगरुन , खाचरे, करुन, राब भाजून आणि चिखल करुन जो भात लावला जातो त्याला आळी म्हणतात. तर डोंगरउतारावर तिथलाच झाड, झाडोरा जाळून, त्यात बी फेकून जे पिक घेतले जाते त्याला दळी म्हणतात. दुसऱ्या शब्दात शेतात भाजलं की 'आळी' आणि डोंगर भाजलं की 'दळी'. आदिवासी दोन्ही पध्दतीने शेती करतात.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासींची लोकसंख्या १०४.५ दशलक्ष एवढी आहे. तिचे भारताच्या एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण ८.६३% इतके आहे. महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या १०.५ दशलक्ष एवढी आहे. महाराष्ट्राच्या लोसंख्येशी तीचे प्रमाण ९.३५% एवढे आहे. महाराष्ट्र आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. मध्यप्रदेश प्रथम क्रमांकावर आहे. रायगड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २६.३४ दशलक्ष त्यामध्ये आदिवासींची लोकसंख्या ३.०५ दशलक्ष म्हणजे रायगड जिल्ह्यात ११.५८% आदिवासी लोक राहतात.

संयुक्त राष्ट्रसंघाने **शाश्वत विकासाच्या** बाबतीत २००० ते २०१५ या काळात सतरा उद्दिष्ट्ये साध्य करण्याचे निश्चित केले होते. अलिकडे २०१६ ते २०३० या काळात ही उद्दिष्ट्ये साध्य करण्याचे निश्चित केले आहे. या उद्दिष्टांतील विविध उद्दिष्ट्ये आदिवासींचे जीवनमानात सुधारणा होण्यासाठी साध्य होणे अत्यंत गरजेचे आहे. जसे उद्दिष्ट क्रमांक - १) शून्य गरीबी २) शून्य भूकबळी ३) चांगले आरोग्य ४) गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण ६) पिण्याचे स्वच्छ पाणी आणि स्वच्छता ७) स्वच्छ, प्रदूषणमुक्त ऊर्जा ८) पर्याप्त रोजगार आणि सर्व समावेशक आर्थिक विकास १०) विषमता कमी करणे. इ. संयुक्त राष्ट्रसंघाने सतरा उद्दिष्ट्ये निश्चित केली असली तरी रायगडमधील आदिवासींच्या जीवनमानाचा विचार करता अग्रक्रमाने वरील आठ उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न होण्याची खूप गरज आहे. माझ्या संशोधन विषयामध्ये या उद्दिष्टांवर भर दिला जाणार आहे.

## २. संशोधन समस्या –

**“आदिवासींच्या शेतीची शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यतेचे चिकित्सक अध्ययन - रायगड जिल्ह्याचा विशेष अभ्यास”** (२०१४ ते २०२४)

## ३. पूर्व संशोधन साहित्याचे परीक्षण –

भारतातील आदिवासीच्या जीवनात शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. आदिवासीच्या शेतीसंबंधीचा अभ्यास अनेक अर्थशास्त्रज्ञ, संशोधक, लेखक आणि विविध तज्ज्ञांनी केलेला दिसून येतो. या अभ्यासातून असे स्पष्ट दिसून येते की, आदिवासीच्या शेतीमध्ये शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यता असल्याचे दिसून येते . उदाहरणार्थ

१. थत्ते मिलिंद (२०१६) - लोक आणि विज्ञान हे दोन्ही घटक स्थानिक पातळीवर म्हणजे गाव किंवा पाड्याच्या पातळीवर यायला हवेत. त्यातून शाश्वत विकासाकडे जाता येईल. उदा. नंदुरबार जिल्ह्यात नेसू नदीवरच्या सात आदिवासी गावांनी केलेला प्रयोग तसचे बारीपाड्याचा आदर्श याचाही उल्लेख करावा लागतो. कारण बारीपाड्याला विविध मार्गांनी शेतीसाठी पाण्याची सोय झाल्याने भात, बटाटा, तूर, हरभरा, सोयाबीन, हळद, मका, ज्वारी, कांदा अशी पिकांची यादी वाढत गेली त्यात उसाची ही भर पडली त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली.
२. साबर भूबनेश्वर (२०१०) आदिवासी शेती - मध्य भारतातील चुकतिया भुंजिया या संशोधन लेखाचा गोषवारा असे सांगतो की, महाराष्ट्र छत्तीसगड आणि ओरिसा मधील चुकतिया भुंजिया ही आदिम जमात आपल्या शेतीमध्ये जैवसांस्कृतिक संसाधनांचा नियमित उपयोग करते. धोरण कर्त्यांनी हा आदर्श घेण्यासारखा आहे. की, पारंपारिक शेती प्रतिमानातील उत्पादन आणि अन्न असुरक्षितता तसेच शाश्वत विकास कसा करावा याला हे एक प्रकारे आव्हान आहे.
३. उपाध्याय मंजूला यांनी त्यांच्या ‘शाश्वत आदिवासी विकास:समस्या, अपेक्षा, धोरणे आणि प्रकरणे’ या संशोधन लेखाच्या निष्कर्षात आदिवासींची शेती ही सेंद्रीय शेती आणि शाश्वत शेती असल्याबाबत अनुकूलता दर्शविली आहे.
४. कऱ्हाडे बी. एम.यांचे, ‘आदिवासी समाजाचे समाजशास्त्र’ या पुस्तकात त्यांनी म्हंटले आहे की, भारतातील अनेक आदिवासी जामती या अद्यापही प्रामुख्याने शेती या एकाच व्यवसायावर अवलंबून आहेत. भारतात शेती हेच उपजिविकेची साधन असणाऱ्या आदिवासींची एकूण संख्या ९०% पेक्षा अधिक आहे आणि शेती हाच व्यवसाय करणाऱ्या आदिवासी जमातीचे राहणीमान व एकूण सामाजिक जीवन एकतर स्थिर आणि समृध्द आहे.

५. देवगांवकर शैलजा 'आदिवासी विश्व' या पुस्तकात प्रख्यात मानववंशशास्त्रज्ञ प्रा. प्यूरर हायमेन्डार्फ यांच्या प्रमाणेच मांडणी केली आहे की, आदिवासीच्या शेतीसाठी कमीतकमी श्रम व साधने लागतात त्या तुलनेत उत्पादन मात्र जास्त आहे. आजच्या स्थितीत असे अशक्य वाटते. अलिकेडे शासनाच्या विकास योजना, समाजसेवी संस्थांनी जे कार्य केले, त्यातून 'सुधरित शेतीपध्दती' अनेक आदिवासींनी स्विकारली आहे.

६. तोंलाँग बांगपन, सूम् पम तंगजंग, अय्यनदार अरुणाचल (२०१७), यांनी आपल्या "आदिवासींची शेती-भारतातील हिमालयाच्या पूर्वेकडील परंपरातील संक्रमण" या संशोधन लेखामध्ये मूळ रहिवासींची शेती आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य असल्याचे म्हटले आहे.

७. किंम-झिआँग बा आणि इतर यांचे 'पर्वतीय प्रदेशातील मूळ रहिवासींची परंपरागत शेती आणि शाश्वत विकास-तैवाण मधील वुटाई गावचा विशिष्ट अभ्यास' ह्या संशोधन लेखाच्या निष्कर्षात असे म्हंटले आहे की, वुटाई गावातील परंपरागत शेतीमध्ये पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात. जसे-अनुकूलन क्षमता आणि पर्यावरणपूरक पध्दतीमध्ये शेती प्रकट होते. स्वयं-पूर्णता, पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता आणि वातावरण बदल आणि स्थानिक संस्कृती आणि विकासाशी संबंधित आहे.

८. लालसू सोमा नोगोटी यांनी 'पुरोगामी जनगर्जना' या मासिकात "तेंदू पत्त्याची गोष्ट" या लेखात असे म्हंटले आहे की, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, एरापल्ली, धानोरा, कोरची येथील तेंदू पत्ता आशिया खंडातील उच्च प्रतीच्या तेंदू पत्त्यामध्ये मोडतो. कोरोना या महामारीमुळे ठेकेदार लिलावात सहभागी होऊ शकले नाहीत. तेंदू पत्त्याच्या विक्रीचा प्रश्न निर्माण झाला अशा परिस्थितीत ग्रामस्थांनी स्वबळावर तेंदू पत्त्याचा व्यवसाय करण्याचे ठरविले. यावरुन लेखकाला असे दाखवून द्यावयाचे आहे की, तेंदू पत्ता असेल किंवा शेती उत्पादन असेल आदिवासींकडे आपल्या उत्पादित उत्पादनांच्या विक्रीचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य आहे.

वरील संशोधक आणि अभ्यासकांच्या निष्कर्षांच्या आधारे असे म्हणता येते की, आदिवासींच्या शेतीची शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यता, विज्ञान आणि आदिवासींची शेती यामध्ये आंतरसंबंध आहेत. परंतु त्यांच्या निष्कर्षांना तेथील भौगोलिक, प्रादेशिक, समाज-राजकीय परिस्थितीचे संदर्भ आहेत. रायगड जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या भौगोलिक, प्रादेशिक, समाज-राजकीय परिस्थितीमुळे त्यांच्या अभ्यासविषयांना मर्यादा पडतात. रायगड जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीची शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यता या बाबतीत अजून अभ्यास झालेला दिसत नाही. माझ्या संशोधन विषयामध्ये या अनुषंगाने अभ्यास अभिप्रेत आहे.

## ४. संशोधन व्यवधान (रिसर्च गॅप) –

आजपर्यंत भारतातील विविध विद्यापीठांमध्ये आदिवासींच्या बाबतीत अनेक प्रकारची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक संशोधने झालेली आहेत. अनेक संशोधकांनी आदिवासींच्या वेगवेगळया प्रकारच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आदिवासींच्या शेतीची शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यता या दृष्टिकोनातून अजून पर्यंत कोणत्याही विद्यापीठात अभ्यास झालेला दिसून येत नाही. प्रस्तुत संशोधन शाश्वत शेती आणि आर्थिक व्यवहार्यता या बाबतीत आदिवासींचा सहभाग नोंदवण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

## ५. संशोधनाचे महत्त्व –

संशोधकांनी प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे मांडले आहे.

१. आदिवासी समाज हा डोंगर उतारावर दऱ्या-खोऱ्यात राहणारा समुदाय आहे. या समुदायाचा विकसित जगाशी अल्प सबंध आहे. भारताचा विचार करता स्वातंत्र्यानंतर गेल्या ७५ वर्षांमध्ये आदिवासींची झालेली शेतीची प्रगती अभ्यासण्याच्या दृष्टिकोनातून या संशोधनाचे महत्त्व विशेष आहे.

२. आदिवासींकडे सद्यस्थितीत अतिशय लहान लहान आकाराची शेतजमीन असून त्यांचा उदरनिर्वाह त्या शेतजमिनीवर होत नाही. त्यामुळे त्यांना शेतमजुरी करावी लागते. शेतमजुरीचे दरही खूप अल्प आहेत. मोठे जमीनदार, शेतकरी, आदिवासी शेतकऱ्यांना केवळ राबवून घेतात मात्र अतिशय कमी मोबदला त्यांना देतात याचाही अभ्यास या संशोधनांमध्ये केला जाणार असल्याने याचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

३. शेतीमुळे आदिवासीशिवाय इतर जमातींचा बऱ्यापैकी किंवा चांगला विकास झालेला आढळतो. परंतु आदिवासीचा फारसा विकास झालेला नाही. आदिवासी अजूनही परंपरागत पद्धतीनेच शेती करतात. शेती विकासाची अत्याधुनिक साधने आदिवासींपर्यंत पोहोचलेली दिसत नाहीत. म्हणून या संशोधनाच्या माध्यमातून शेती विकासाबाबतचे अध्ययन केले जाणार आहे.

४. संपूर्ण जग आणि भारत शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून वाटचाल करीत असताना त्यापासून आदिवासी वंचित असल्याचे चित्र दिसते. शाश्वत शेतीमुळे आदिवासींच्या जीवनात होणारे बदल अभ्यासले जातील .

५. शाश्वत विकास घडवून आणावयाचा असेल तर आदिवासींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आदिवासींकडे उपलब्ध असणारे धारणक्षेत्र अतिशय अल्प असल्यामुळे ते किफायतशीर नाही. याचा परिणाम त्यांची शेती आर्थिकदृष्टीने व्यवहार्य असलेली दिसत नाही. शेती आर्थिक व्यवहार्य पूर्ण होत नसल्याने आदिवासींच्या सामाजिक आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम होतो. या दृष्टिकोनातून हे संशोधन महत्त्वाचे आहे.

६. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्या मांडून त्यावर सूचना मांडण्याचा प्रयत्न केला जाईल. संशोधन अहवालाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करता येईल.

## ६. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –

### अ) संशोधनाची व्याप्ती –

प्रस्तुत संशोधन केवळ रायगड जिल्हा पुरतेच मर्यादित आहे. महाराष्ट्रातील इतर आदिवासी जिल्ह्यांना निष्कर्ष लागू पडतीलच असे नाही २०१४ ते २०२४ या दहा वर्षांचा अभ्यास केला जाईल.

### ब) संशोधनाच्या मर्यादा –

दुय्यम आकडेवारी उपलब्ध होण्यात अडचणी येऊ शकतात संशोधक यथाशक्ती वरील मर्यादावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करील.

## ७. संशोधनाची उद्दिष्ट्ये –

आदिवासींच्या शेतीसंबंधीच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे गृहित धरली आहेत.

१. शेतीच्या मानवी, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय शाश्वत विकासाचा अभ्यास करणे.
२. आदिवासींच्या शेतीची आर्थिक व्यवहार्यता तपासणे.
३. आदिवासी शेतकरी आणि बिगर-शेती आदिवासींच्या जीवनमानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४. शेती उत्पादकता आणि विज्ञानाच्या आंतरसंबंधाचा अभ्यास करणे.
५. शेतीविषयक सरकारी धोरणाचे परीक्षण करणे.
६. शेतीसंबंधीच्या अडचणींचा/समस्यांचा अभ्यास करणे.
७. शाश्वत शेती आणि आर्थिक व्यवहार्यता वाढीसाठी उपाययोजना सूचविणे.

## ८. परिकल्पना –

आदिवासींच्या शेतीसंबंधीचा अभ्यास करताना पुढीलप्रमाणे गृहितांची तपासणी करण्याचे निश्चित कले आहे.

१. आदिवासींच्या शेतीमध्ये मानवी, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय शाश्वत विकासाची क्षमता आहे.
२. आदिवासींच्या शेतीला विज्ञानाची जोड दिल्यास शेतीची आर्थिक व्यवहार्यता वाढविणे शक्य आहे.
३. शेती करणारे आदिवासी आणि बिगरशेती आदिवासी यांचे जीवनमानात तफावत आहे.

## ९. संशोधन पद्धती –

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक व विशेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. आदिवासींच्या शेतीच्या शाश्वततेची आणि व्यवहारितेची वास्तविक अध्ययन करणे हा यामागचा उद्देश आहे.संशोधन उद्दिष्टानुसार आराखडा तयार करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन -** प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा माहिती जमा करण्यासाठी वापर करण्यात येणार आहे.

अ) **प्राथमिक स्रोत -** प्रस्तुत संशोधनासाठी निरीक्षण, मुलाखत, अनुसूची, या पद्धतींचा उपयोग करून माहिती संकलित केली जाईल. नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी शेतकऱ्यांची माहिती जमा करण्यासाठी अनुसूचीचा वापर केला जाईल.

ब) **दुय्यम स्रोत –** प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम सामग्रीचा वापर केला जाईल. यामध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, संशोधन लेख, सर्वेक्षण अहवाल, वृत्तपत्रातील माहिती, शासकीय दस्ताऐवज आणि विविध संकेतस्थळे यांचा वापर केला जाईल. दुय्यम सामग्रीसाठी आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे, टाटा सामाजिक संशोधन संस्था मुंबई, जिल्हा सांख्यिकी अधिकारी कार्यालयाचा आधार घेतला जाईल.

**नमुना निवड –** प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड तंत्राचा वापर केला जाईल. रायगड जिल्ह्यातील ज्या तालुक्यांमध्ये सर्वाधिक आदिवासी शेतकरी आहेत त्या सर्व तालुक्यांची निवड प्रस्तावित आहे. रायगड जिल्ह्यात एकूण १५ तालुके आहेत. त्यापैकी संशोधनासाठी कर्जत, खालापूर, पनवेल, पेण, अलिबाग, रोहा, मुरुड, माणगाव, महाड, तळा या तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. या तालुक्यातील ब्रिटिश काळापासून आदिवासी शेतकऱ्याची (दळी धारकांची) एकूण संख्या तसेच २००६ च्या कायद्यानुसार मान्यता मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्याची एकूण संख्या यानुसार नमुना निवडीसाठी १० टक्के याप्रमाणे ८०३ इतका नमुना प्रस्तावित आहे. नमुना निवडीसाठी साधा यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर केला जाईल.

### नमुना निवडीचा आकृतीबंध

| तालुके | ब्रिटीशकाळापासून दळी धारकांची एकूण संख्या | २००६च्या कायद्यानुसार मान्यता मिळालेल्या आदिवासी शेतकऱ्याची एकूण संख्या | एकूण आदिवासी शेतकरी | नमुना १० टक्के या प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| कर्जत | ७८० | ९५ | ८७५ | ८७ |
| खालापूर | ३३७ | ७२ | ४०९ | ४० |
| पनवेल | ५३४ | ३१८ | ८५२ | ८५ |
| पेण | १३५३ | ८६० | २२१३ | २२१ |
| अलिबाग | २२० | ६६१ | ६८१ | ६८ |
| रोहा | १३४५ | ५७५ | १९२० | १९२ |
| मुरुड | २२२ | ११ | २३३ | २३ |
| माणगांव | ४७६ | १३९ | ६१५ | ६२ |
| महाड | १३१ | - | १३१ | १३ |
| तळा | - | १२० | १२० | १२ |
| **एकूण** | **५३९८** | **२८५१** | **८२४९** | **८०३** |

### १० प्रकरण व्यवस्था

### प्रकरण पहिले: प्रस्तावना

i) अभ्यासाची पार्श्वभूमी इतर संशोधकांच्या संशोधन साहित्याचे परिक्षण

ii) अभ्यासाचे महत्व

iii) अभ्यासाची दिशा

iv) समारोप

### प्रकरण दोन : शाश्वत विकास आणि आर्थिक व्यवहार्यता आणि रायगड जिल्ह्यातील आदिवासी

i)शाश्वत विकास आणि आर्थिक व्यवहार्यता संकल्पना आणि सिद्धांत

ii ) रायगड जिल्ह्यातील आदिवासीची स्थिती

iii) सामाजिक शैक्षणिक भौगोलिक

iv) आर्थिक आणि आरोग्य विषयक

v) शेतिविषयक स्थिती

vi) समारोप

**प्रकरण तीन :रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या शेतिविषयक माहितीचे संकलन आणि विश्लेषण**

i ) आदिवासींची शेती पारंपरिक आणि आधुनिक

ii) आदिवासींचे शेती विषयक उत्पन्न

iii) आदिवासींच्या उत्पन्नाचे स्त्रोत

iv) आर्थिक उत्पन्न आणि आदिवासींचे जीवनमान

v) समारोप

**प्रकरण चार: रायगड जिल्ह्यातील आदिवासीची शेतीची शाश्वतता आणि आर्थिक व्यवहार्यता**

i) रायगड जिल्ह्यातील आदिवासींची शेती आणि पर्यावरणीय शाश्वत विकास आणि आर्थिक व्यवहार्यता : परस्पर संबंध

ii) रायगड जिल्ह्यातील शेती : शाश्वत विकास

iii) रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या शेतीची आर्थिक व्यवहार्यता

iv ) समारोप

**प्रकरण पाच: निष्कर्ष आणि शिफारशी**

## ११ संदर्भसूची -


१. मिलिंद बोकील (२००६), 'कातकरी विकास की विस्थापन?' मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगाव मुंबई .

२. खंडेराव सावे (१996) 'वारली' कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे.

३. मिलिंद थत्ते (२०१६) 'रानबखर' (आदिवासींच्या जीवनसंघर्षाचे पदर) समकालीन प्रकाशन८, अमित कॉम्प्लेक्स, ४७४, सदाशिव पेठ, पुणे .

४. डॉ. बी. एम् कऱ्हाडे (२०१०) 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

५. गुरुनाथ नाडगोंडे (२०१२) 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे.

६. डॉ. देवीदास खोडेवाड (२०१८) श्री. शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

७. डॉ. सौ. शैलजा देवगांवकर आणि डॉ. एस्.जी. देवगांवकर (२०२१) 'आदिवासी विश्व' श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, १ भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर.
८. डॉ. भागवत नामदेव आकरे (२०२२) 'आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना', पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स २०६, राममंदिर गल्ली, टिळक पुतळा, महाल, नागपूर.
९. डॉ. राजकुमार भगत (२०२१) 'बंजारा समाजाचे अंतरंग' श्री साईनाथ प्रकाशन, १ भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ नागपूर.
१०. डॉ. प्रकाश आमटे (२००९) 'प्रकाशवाटा', समकालीन प्रकाशन- पुणे.
११. Tonlong wangpan and other (2017) : 'Tribal agriculture: Tradition transition in the Indian Eastern Himalaya'(R.A.)
१२. Dr. Manjula Upadhya, 'Sustainable Tribal Development: problems, prospects, policies and cases.' (R.A.)
१३. Bhuvneswar Sabar, 'Tribal Agriculture: The Chuktia Bhunijas in Central India' (RA).
१४. Qing-Xiong Ba and other, 'Traditional Farming and sustaibanle Development of an Indigenous Community in the Mountain Area-A Case study of Wutai Village in Taiwan' (RA)
१५. डॉ. गोविंद गारे (२०००) 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॅन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर, पुणे.
१६. योजना – मासिक, (जुलै २०२२) 'भारतातील आदिवासी'.
१७. ॲड. लालस सोमा नोगोटी(२०२१) 'तेंदू पत्त्याची गोष्ट' 'पुरोगामी जनगर्जना', आरोग्य सेना राष्ट्रीय मुख्यालय, १० सणस प्लाझा, बाजीराव रोड, पुणे.
१८. Awais mohamad, 'Agriculture and Tribal Development in Tarai Region of Utter Pradesh'. Rajesh Publication New Delhi.
१९. Thakur Devendra, Thakur D.N., 'Tribal Agriculture and Animal Husbandry (Tribal life in India – 3) Deep and Deep Publication PVT. LTD. New Delhi.

| | |
|---|---|
| कुंडलिक भिमराव चौगुले<br>संशोधक | प्रा. डॉ .सी .जे देशमुख<br>संशोधन मार्गदर्शक |